# प्रेसनोट

## पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांची जयंती

जा.क्र. ६६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२५/०९/२०१७

भंडारा:— पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २५/०९/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु, यांच्या मागदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक भंडारा रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधीक्षक (गृह) एस. व्ही कुलकर्णी पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

यावेळी पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांचा जन्म २५ सप्टेबंर १९१६ जिल्हा मथुरा गाव नगला चंद्रभान येथे झाला, वडीलाचे नाव भगवती प्रसाद उपाध्याय व आईचे नाव रामप्यारी होते. हे भारतीस जनसंघाचे राष्ट्रीय सचीव होते. डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या सह भारतीय जनसंघाच्या पाया भरणे यांचा महत्वाचा वाटा होता, भारतीय जनसंघातुन पुढे भारतीय जनता पक्षाचा उगम झाला.

पंडीत दिनदयाळ उपाध्याय १९३७ साली कानपुर येथे संघाचे स्वयसेवक झाले. व १९४२ मध्ये प्रचारक झाले, साधी राहणी उच्च विचार सरणी हा त्याचा स्वभाव होता. शास्त्रे, धर्मग्रंथ, आणि तात्वीक ग्रंथाचे चिंतनातुन, मनातुन त्याची एकात्म मानव वाद हा सिधांत मांडला. पंडीत दिनदयाळ यांनी आग्रा, प्रयाग येथे बी. एस.सी बी. टी केल्या नंतर त्यांनी नौकरी केली नाही. त्यांनी आपले जिवन राष्ट्रीय स्वयसेवक संघात विलीन केले. व सन १९५१ मध्ये त्यांना अखिल भारतीय जनसंघाचे संघटन मंत्री बनविण्यात आले, अश्या थोर पुरूषांची जंयती आज आपण साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. व्ही. आर कुलकर्णी, पोनी. सिडाम जिवीशा भंडारा, पोनी. खंडाते, सपोनि. पोटे स्थागुशा भंडारा, मपोउपनी. लांजेवार, पोउपनी. तुळजेवार, पोलीस मुख्यालय राखीव पोलीस निरीक्षक वर्मा, पोउपनी प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**(मपोउपनि. प्रणती लांजेवार)**
**महिती कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.